# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५३ वा ❑ भारतीय सौर दिनांक १३ चैत्र शके १९४८, शुक्रवार दि.०३ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### सुशिक्षित लोक भोंदू बाबाच्या जाळ्यात का ओढले जातात?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षण घेण्याचा मुख्य उद्देश व्यक्तीचा बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक विकास करणे, तसेच तिला एक जबाबदार नागरिक बनवणे हा आहे . हे ज्ञान, कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टीकोन प्रदान करून जीवनमान सुधारण्यास आणि स्वावलंबी बनण्यास मदत करते. शिक्षणाचा हा व्यापक उद्देश समोर असताना देखील सुशिक्षित तरुण, उद्योगपती राजकारणी, तरुण भोंदु बाबाच्या चरणी नतमस्तक का होतात?

अज्ञानी निरक्षर लोक जर अज्ञानाने भोंदु साधू संतांकडे जात असेल तर ते अज्ञानामुळे न समजल्याने जात असेल असे समजायला हरकत नाही मात्र उच्च शिक्षण घेऊन वैज्ञानिक दृष्टिकोनाची कास धरण्याऐवजी लोक भोंदू साधू संतांकडे जातात हे एक न समजण्यापलीकडचे कोडे आहे.

सुशिक्षित लोक मानसिक ताण, आर्थिक अनिश्चितता, भावनिक कमकुवतपणा आणि वैयक्तिक संकटांच्या काळात मदतीसाठी भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकतात. पदव्या असूनही वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव, भीती, लोभ आणि चमत्कारावर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती त्यांना फसवणुकीच्या मार्गावर नेते या प्रकरणांमध्ये महिलांचे लैंगिक शोषण आणि मोठी आर्थिक फसवणूक प्रामुख्याने दिसून येते,असे आतापर्यंतच्या भोंदू बाबांच्या भंडा फोडीतून समोर आले आहे.

नाशिकमधील अशोक खरात सारख्या भोंदू बाबांनी महिलांचे लैंगिक शोषण आणि कोट्यवधींचा आर्थिक घोटाळा केल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत, ज्यामुळे भोंदूगिरीचा उद्योग जोरात असल्याचे उघड झाले आहे या प्रकरणी राजकीय नेते आणि प्रतिष्ठित कुटुंबांतील व्यक्तींचा सहभाग असल्याचे बोलले जात असून, मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

सुशिक्षित लोक भोंदू बाबांच्या जाळ्यात का अडकतात? हा खरा प्रश्न आहे उच्चशिक्षित असूनही, आयुष्यातील संकटे, आजारपण किंवा कामाच्या ठिकाणचा ताण सहन न झाल्याने, मन शांत करण्यासाठी ते भोंदू गुरूंकडे आध्यात्मिक शांती शोधायला जातात.

पदवी असली तरीही, अंधश्रद्धा आणि तर्कबुद्धी यांमधील फरक न समजल्यामुळे ते चमत्कारांवर विश्वास ठेवतात. जेव्हा उच्चपदस्थ, श्रीमंत किंवा प्रतिष्ठित लोक एखाद्या बाबाकडे जातात, तेव्हा सामान्य सुशिक्षित व्यक्तीलाही वाटते की ''हे लोक जातात, तर काहीतरी खरेच असेल'', यालाच म्हणतात. जसे की पी खरात कडे जाणारे सुशिक्षित,उद्योगपती,राजकारणी होते. अशोक खरात याचा प्रभाव दिवसागणिक वाढत असल्यामुळे अनेक नेते मंडळी आणि सेलिब्रिटी देखील त्याच्या संपर्कात होते अनेक मोठे नेते आणि अधिकारी देखील भोंदू बाबाकडून सल्ला घेत होते

सध्या देशात खराचे प्रकरण समोर असताना कानपूर मध्ये तंत्र मंत्रासाठी विवाहितेला विवस्त्र करून पूजेला बसविण्याची धक्कादायक घटना घडली. संपत्ती आणि समृद्धीसाठी अंधश्रद्धा मंत्र तंत्र आणि जादू टोण्याच्या आधीन झालेल्या एका उच्चभ्र कुटुंबाने नव विवाहित सुनेसोबत केलेल्या कौर्याची धक्कादाय घटना समोर आली आहे.कानपूर मधील सासू साऱ्यांनी सुनेला विवस्त्र करून संपूर्ण कुटुंबासोबत पूजेला बसवले धक्कादाय बाब म्हणजे या महिलेच्या पतीने पत्नीला साथ न देता कुटुंबीयांची बाजू घेतली एवढेच नव्हे तरी त्या महिलेला मारहाण करण्यात आली तसेच बाहेरून कोट्यावधी रुपये आणण्यासाठी दबाव आणला. याप्रकरणी आता महिलेने पोलिसांमध्ये तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोंदू बाबा खरात तुरुंगात असून पोलीस कसून चौकशी करत असतानाच हा प्रकार कानपूर मध्ये घडला. राजकारणी शिक्षित लोक जर बाबांकडे जायला लागतात तेव्हा स्वाभाविकपणे सामान्य जनतेला विश्वास वाटायला लागतो. नेमका याचा फायदा घेऊन भोंदू बाबा

भविष्य सांगणे, लक्ष्मीप्राप्ती, किंवा व्यापारात भरभराट करून देण्याचे खोटे आमिष दाखवून भोंदूबाबा लोकांना जाळ्यात ओढतात.

समस्यांवर शॉर्टकट उपाय: करिअर किंवा वैयक्तिक जीवनातील गुंतागुंत सोडवण्यासाठी कष्टाऐवजी तांत्रिक उपाय किंवा चमत्कारी उपायांवर विश्वास ठेवणे,अशा मार्गाचा अवलंब करतात.

मुळात बळी पडणारा हा सुशिक्षित नाहीच तर ते फक्त शिक्षित आहे, जीवन हे सुख आणि दुःखाने बनलेले आहे. दोन्हीही प्रत्येकाच्या आयुष्यात समांतर येणार, आणि दुःख दूर करण्याचे मार्ग ही व्यक्तीकडे असतात पण त्यावर तो मार्गक्रमण करीत नाही आणि नेमके अश्या वेळी तो अश्या भोंदू च्या आहारी जातो व त्यास बळी पडतो, या एकवीस व्या वैज्ञानीक युगात ही अशी शिक्षित मंडळी या बावा बुवा च्या नादी लागतात यांच खूप आश्चर्य वाटतं....

शिक्षणान फक्त आणि फक्त डिग्री/सर्टिफिकेट/मार्कशीट मिळते.जी भविष्यात नोकरीसाठी, पात्रता म्हणून उपयोगी ठरते.

ज्ञान किंवा अक्कल हे, प्रत्येक परिस्थिती नुसार कोण कसे अनुभव म्हणून घेतय यावर अवलंबून असते,असे खेदाने म्हणावे लागत आहे. शिक्षण घेतल म्हणजे त्याला खरच अक्कल आहे, अस अजिबात नाही.

शिक्षण असूनही जेव्हा माणूस भावनिकदृष्ट्या कमकुवत होतो, तेव्हा भोंदूबाबा त्यांच्या याच अगतिकतेचा फायदा घेतात. पुण्यातील खरात प्रकरणासारख्या घटनांमधून हे स्पष्ट होते की, कितीही शिकले तरी अंधश्रद्धा माणसाला चुकीच्या मार्गावर नेऊ शकते.

# साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार जाहीर

## ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक कौतिकराव ठाले-पाटील या पुरस्काराचे मानकरी

**ज्योतिर्मय साहित्य**

अंबाजोगाई – साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ कवयित्री अनुराधा पाटील व साहित्यिक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांना जाहीर झाला आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे आणि त्यांच्या कार्याला खंबीर साथ देणाऱ्या साधनाताई आमटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे (१९२६२०२६) औचित्य साधून २०२६ पासून साधनाताई बाबा आमटे सहजीवन गौरव पुरस्कार एका दांपत्याला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून शाल, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पहार व एक लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.

दगडू लोमटे हे गेली ४० वर्षे आनंदवनाशी जोडले आहेत. त्यांनी पुरस्कार सुरू करावा असा प्रस्ताव मांडला. संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी तो मान्य केला. पुरस्कार निवडीसाठी अमर हबीब, डॉ. शैलजा बरुरे व बालाजी सुतार यांची निवड समिती नेमली होती. त्यात दगडू लोमटे व डॉ. शुभदा लोहिया यांनी संस्थेचे सदस्य म्हणून काम केले. या पुरस्काराचा वितरण समारंभ, ठिकाण व तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे.

अनुराधाताई पाटील यांनी 'दिगंत', 'तरीही', 'दिवसेंदिवस', 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ', 'कदाचित अजूनही', 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती' हे कवितासंग्रह, 'नवसाला पावली डॉक्टरीण' हा प्रौढ साक्षरांसाठी दीर्घ कथासंग्रह व 'दरअसल', 'अनुराधा पाटील री टाळावीं मराठी कवितावां' राजस्थानी व 'हत्या केवल शब्द नही हैं' हे हिंदी अनुवादित कविता संग्रह प्रकाशित आहेत. त्याच बरोबर उडिया कविता, हिंदी कथा व कवितांची मराठीतील भाषांतरे प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितांचे हिंदी, उर्दू, उडिया, पंजाबी, राजस्थानी, मल्याळम, बंगाली, जपानी, इंग्रजी या भाषेतील नियतकालिकेतून त्यांचे साहित्य अनुवादित होऊन प्रकाशित झाले आहे. त्यांच्या साहित्य कार्याला साहित्य अकादमी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मान्यताप्राप्त साहित्य संस्थांचे मानाचे २५ हून अधिक पुरस्कार मिळालेले आहेत.

साहित्य अकादमी पुरस्कार निवड समितीच्या तज्ज्ञ परीक्षक, जैन फौउंडेशन पुरस्कार निवड समितीच्या अध्यक्ष, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय (विविधभाषा) कवी संमेलन, चर्चा सत्रे, प्रतिष्ठेच्या केरळ साहित्य महोत्सव, जयपूर साहित्य महोत्सव, मुंबई साहित्य महोत्सवात मराठी भाषेच्या कवी म्हणून निवड झाली होती. विविध भाषिक संमेलनाच्या



उद्घाटक, अनेक संमेलनात व आकाशवाणी दूरदर्शनवर मुलाखती झाल्या. शालेय अभ्यासक्रमात व अनेक विद्यापीठात मराठी अभ्यासक्रमात त्यांची अनेक पुस्तके लागलेली आहेत. मराठवाडा साहित्य परिषद, प्रतिष्ठान मासिकाचे संपादक मंडळ, साहित्य अकादमी महाराष्ट्र, राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, भारतीय भाषा परिषद कलकत्ता या संस्थांचे त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. महत्वाचे साहित्य अकादमी दिल्ली येथे पाच वर्षे सदस्य म्हणून उत्तम कार्य केले आहे.

कौतिकराव ठाले पाटील हे उत्तम प्रशासक, लेखक, संघटक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून सुपरिचित आहेत. त्यांची 'संमेलनाच्या मांडवाखालून', 'मराठी भाषिक आणि साहित्य संकृती', हे ग्रंथ व 'वाचनवेध', 'शेतकऱ्याचा आसूड', व प्रतिष्ठानच्या अनेक विशेषांकाचे संपादन केले आहे. महात्मा गांधी मिशन, संभाजीनगर, व परळी, माहूर, येथील साहित्य सेवा पुरस्कारा बरोबरच महाराष्ट्र शासनाचा मंगेश पाडगावकर 'भाषा संवर्धन पुरस्कार' प्राप्त आहे.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे दोन वर्षा पेक्षा जास्त काळ प्रशासक म्हणून कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, भाषा मंडळाचे अध्यक्ष व कला शाखेचे अधिष्ठाता म्हणून कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ते कांहीं काळ हंगामी कुलगुरू म्हणून कार्यरत होते. मराठी भाषेच्या अध्यापनापासून सुरू झालेली मराठी साहित्याची सेवा ते आजही करीत आहेत.

मराठवाडा साहित्य परिषदेचे काही काळ सचिव व २६ वर्षांपेक्षा अधिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून महत्त्वपूर्ण काम त्यांनी केले व करीत आहेत. अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते तीन वर्षे सचिव व दोन वेळा ६ वर्ष अध्यक्ष म्हणून त्यांनी कारकिर्द गाजवली आहे. नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीचे भाषा सल्लागार व साहित्य अकादमी दिल्लीचे व महाराष्ट्र शासन साहित्य पुरस्कार समितीचे पाच वर्षे सदस्य म्हणून काम केले. राष्ट्रीय भाषा चर्चा सत्रातील त्यांचा सहभाग, कार्यशाळेतील त्यांची भाषणे दिशादर्शक ठरली आहेत. २००४ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे पारपडलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते कार्याध्यक्ष होते. हे संमेलन सर्वार्थाने मराठी साहित्यातील मूल्य संस्कृतीची श्रीमंती दर्शविणारे ठरले होते.

विश्व मराठी साहित्य संमेलनाची कल्पना प्रथम त्यांनी मांडली. प्रचंड टीका व विरोधाला न डगमगता त्यांनी अमेरिका व दुबई येथे ही संमेलने घेतली.

मराठवाडा साहित्य परिषदेचा विस्तार व प्रादेशिक संमेलने घेऊन महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या दोघांच्या साहित्य कार्याचा महत्त्वपूर्ण सहभाग व महत्व पाहता अनुराधाताई पाटील व कौतुकराव ठाले पाटील यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

# जवळ असूनही दूर...

**ज्योतिर्मय साहित्य**



कधी काळी नाती म्हणजे सुरक्षिततेची चादर होती. थंडी वाजली की अंगावर घ्यावी आणि थकवा आला की तिच्यात विसावावं. शब्दांची फारशी गरज नसायची; फक्त उपस्थिती पुरेशी असायची. आई स्वयंपाकघरात असली की घर जिवंत वाटायचं. वडील घराबाहेर असले तरी त्यांच्या अस्तित्वाचा स्पर्श मनाला आधार द्यायचा. आजही तीच माणसं आहेत, तीच घरं आहेत. तरीही नात्यांमधली उब कुठेतरी कमी झाल्यासारखी वाटते. जाणवतंय, पण बोट ठेवून सांगता येत नाही; नेमकं दुखतंय कुठे?

आज नाती तुटलेली नाहीत, पण प्रचंड थकलेली आहेत. ओढ कमी आणि अपेक्षा जास्त आहेत. संवाद होतो, पण तो केवळ माहितीच्या देवाणघेवाणीपुरताच. आपण सगळे जण एकमेकांपासून पळत नाही आहोत, पण एकमेकांपर्यंत पोहोचण्याचं धाडसही आता उरलेलं नाही. आणि या न बोललेल्या शब्दांमुळेच एक शांतता साचते, हळूहळू बोचरी आणि अस्वस्थ करणारी.

**ना ते....**

**मंगेश दौंडकर, पुणे, मो.- 9890619354**



यंत्रवत धावणाऱ्या आयुष्यात नात्यांसाठी थांबणं कठीण झालं आहे. काम, स्पर्धा, यश, स्वतःचं अस्तित्व सिद्ध करण्याची धडपड या सगळ्यात माणूस इतका गुंतून जातो की त्याला समोरच्याच्या डोळ्यांतील थकवा दिसेनासा होतो. पूर्वी ''कसा आहेस?'' या प्रश्नात जिव्हाळा असायचा. आज तो केवळ औपचारिकतेचा भाग बनला आहे. उत्तर ऐकण्यासाठी वेळच नसेल, तर प्रश्न विचारण्यात अर्थ काय?

एकाच छताखाली राहूनही आज प्रत्येकजण आपापल्या आभासी जगात बंदिस्त झाला आहे. जेवणाच्या ताटाभोवती एकत्र जमणारी कुटुंबं आता क्वचितच पाहायला मिळतात. एकेकाळी गप्पांनी रंगलेली घरं मोबाईलच्या नोटिफिकेशन्समध्ये हरवली आहेत. सोशल मीडियावर शेकडो चेहरे परिचयाचे वाटतात, पण मन मोकळं करून बोलता येईल असा एखादाच भेटतो. वाढदिवसाला स्टेटसचा पाऊस पडतो, पण दुःखाच्या दिवशी फोन वाजेलच, याची खात्री नसते. ''लाईक्स'' आणि ''कमेंट्स'' च्या गर्दीत खरं ऐकून घेणं सुद्धा दुर्मिळ झालं आहे.

तंत्रज्ञानानं आपल्याला जगाशी जोडलं असलं, तरी आपल्या माणसांपासून मात्र खूप दूर नेलं आहे. व्हिडिओ कॉलवर कृत्रिमपणे हसणारे चेहरे प्रत्यक्ष भेटीत मात्र पूर्णपणे अबोल असतात. नजरेला नजर भिडवून मनमोकळं बोलण्यापेक्षा हातातील मोबाईलच्या निळ्या प्रकाशात हरवून जाणं आपल्याला अधिक सोयीस्कर वाटू लागलं आहे. आपण हे विसरत चाललो आहोत की नात्यांची खरी उब ही एकमेकांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत आणि न बोलता समजून घेण्यात असते. नातं ही देखभालीची गोष्ट आहे. जसं एखादं झाड रोज पाणी मागतं, तसंच नातंही लक्ष मागतं. दुर्लक्ष केलं तर ते कोमेजतं; वेळ दिला तर फ ुलतं.

अजूनही वेळ गेलेली नाही आणि नात्यांमधली ती उब पूर्णपणे हरवलेली नाही. ती फक्त सध्याच्या धावपळीत थोडी झाकोळली गेली आहे. थोडासा वेळ दिला आणि एकमेकांचं म्हणणं थोडं समजून घेतलं, तर ती पुन्हा जागी होऊ शकते, एका छोट्याशा फोन कॉलमधून, अनपेक्षित भेटीतून किंवा साध्या ''मी आहे ना'' या वाक्यातूनही. जग जिंकण्याच्या नादात आपण नात्यांकडे दुर्लक्ष करतो, पण नात्यांशिवाय जिंकलेलं जगही रिकामंच भासतं.

शेवटी, माणूस हा भावनिक प्राणी आहे. त्याला शब्दांपेक्षा भावना कळतात, सल्ल्यांपेक्षा सहानुभूती हवी असते आणि परिपूर्णतेपेक्षा आपलेपणाची उब हवी असते. नात्यांमधली दुरावत चाललेली उब परत आणायची असेल, तर आपल्यालाच थोडं थांबावं लागेल, थोडं मागे वळून पाहावं लागेल. कारण नाती वाचवण्यासाठी जग बदलण्याची गरज नाही; फक्त आपल्या मनाची कवाडं थोडीशी उघडण्याची गरज आहे.

***





ज्योतिर्मय

गुढीपाडव्यापासून आपण ज्योतिर्मय दैनिकात वाढदिवसाच्या शुभेच्छा जाहिराती सुरु करीत आहोत, आपल्या घरातील मुलांचे किंवा मुलींचे वाढदिवस शुभेच्छारुपी जाहिराती मधून साजरे करणार आहोत.

शुभेच्छा दिल्याने प्रेम वाढते, आपुलकी वाढते तसेच आनंदी वातावरण निर्माण होते.

सर्वांना ही कल्पना निश्चित आवडेल असे मला वाटते.

त्याकरिता नाममात्र शुल्क असणार आहे.

- 15 वर्षाच्या आत असेल तर फक्त 100 रुपये
- 15 वर्षावरील व्यक्तीस फक्त 300 रुपये.
- जाहिरातीचा मॅटर व पैसे वाढदिवसाच्या दोन दिवस अगोदर पाठविणे.
- डिझाईन करून पाठविले तरी चालेल, किंवा मॅटर व्हाट्सअप वर पाठविणे, मॅटर लिमिटेड असावा.
- जाहिरातीचे पेमेंट 7743918559 या नंबरवर ऑनलाईन पाठविणे.
- काही शंका असेल तर 7743818559 या नंबरवर फोन करणे.
- पुण्यस्मरणची जाहिरात पण फक्त 100 रु.मध्ये प्रकाशित केली जाईल.

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे



# जात्यावरच्या ओव्या......

खोट दाबतया तोंड
खर्याचा चालला जीव
कुणी येईना वाचवाया
आल समाजाला हीव ||५७४||

सोंग करत खर्याच
खोट तरबेज झाल
खर समजून खोट्या
जन बावळट झाल ||५७५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १४



ज्योतिर्मय साहित्य

जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला ।
परी शेवटीं काळमुखीं निमाला ।।
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले ।
कितीएक ते जन्मले आणि मेले ।।१४।।

अर्थ : आपल्या पूर्वसंचित कर्मांमुळे आपल्याला हा मनुष्यजन्म प्राप्त होतो. हा जन्म खरोखरच दुर्लभ आहे; परंतु असे असले तरी मृत्यू कोणालाही चुकलेला नाही. म्हणून हे मना, विचार कर या जगात अनेक महापुरुष होऊन गेले; परंतु त्यांनाही मृत्युपंथाची वाट धरावीच लागली. सर्वसामान्य माणसे तर किती जन्मली आणि मेली याची गणतीच नाही.

विवेचन :

या श्लोकातून समर्थ रामदास स्वामी मानवी जीवनाचे एक अटळ सत्य सांगतात. मागील श्लोकात त्यांनी ''बळे लागला काळ हा पाठिलागी'' असे म्हटले आहे. त्याच विचाराची अधिक स्पष्ट मांडणी येथे दिसते. मनुष्यजन्म दुर्लभ असला तरी मृत्यू हा त्याचा अविभाज्य भाग आहे.


राम, कृष्ण, संत ज्ञानेश्वर यांसारखे महान पुरुष या पृथ्वीवर होऊन गेले; पण त्यांनाही एक दिवस मृत्युपंथाचा स्वीकार करावाच लागला. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात ''जे जे उपजे ते नाशे''. म्हणजेच जे निर्माण होते ते नाश पावतेच. जन्म आणि मृत्यूचे हे चक्र अखंड चालूच असते.

निसर्गातही हेच दिसते. झाडावरील पिकलेली पाने गळून पडतात आणि त्यानंतरच नव्या पालवीला जागा मिळते. थोडक्यात सांगायचे तर नवनिर्मितीसाठी जुन्याचा निरोप आवश्यक असतो. मृत्यू ही देखील निसर्गाच्या या नित्यचक्रातील एक महत्त्वाची क्रिया आहे.

जन्म आणि मृत्यू या जणू एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवनाला कंटाळलेले वृद्ध किंवा असाध्य रोगांनी त्रस्त झालेले काही जण मृत्यूला वरदान मानतात. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे मनुष्य जुने झालेले वस्त्र टाकून देऊन नवीन वस्त्र धारण करतो; त्याप्रमाणे आत्मा जर्जर देह सोडून नवीन शरीर धारण करतो. त्यामुळे मृत्यू हा अंत नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे असेही म्हणता येईल.

(क्रमशः)


## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देहान्त निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

म्हणून साधुसंत नेहमी पुण्य प्राप्त करण्यासाठी साधकाला प्रेरित करतात. अनंत:काळी मुक्ति मिळण्यासाठी सतत संतवचनाचा विचार करून जीवन जगले पाहिजे.

भगवंताची भक्ति केली नाही तर अंतकाळी पावन पवित्र होत नाही. देहाच्या दृष्टीने त्याला सुखाचे मरण आले तरी भक्ति न केल्याने तो वाईट गतीलाचं जातो. अशी वेळ कुणावरही येऊ नये असे आत्मसाक्षात्कारी नेहमी सांगतात. सद्गुरू नेहमी पुण्य प्राप्त करण्यासाठी साधकाला प्रेरित करतात म्हणून त्यांचा लौकिक अर्थाने अंतकाळ उत्तम झाला आहे असे म्हणतात. ज्यांचे शरीर भगवंताच्या कारणी लागते ते धन्य होत.

साधुसंत बाहेरच्या जगात नेहमीच इतरांच्या सारखे वागतात परंतु त्यांच्या अंत:करणाची अवस्था निराळी असते. देहाला कष्ट झाले किंवा दुःख झाले तरी त्यांच्या जीवनावर काहीच परिणाम होत नाही. ते सतत स्वानंदामध्ये मग्न असतात.

मी देह आहे या भावनेचा स्पर्श त्यांना झालेला नसतो.

अंतकाळ कुठेही कसाही झाला तरी त्यांना काही फरक पडत नाही. ते ब्रम्ह पदाला पोहोचलेले असतात.


मी आत्मा आहे अशी त्यांची ठाम भावना असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास झाला तरी काही फरक पडत नाही. त्यांच्या देहाचे लचके कुत्र्याने तोडले तरी ते म्हणतात की त्यांना हवे होते ना!!!

त्यांचे समाधान झाले ना!!

मग माझ्या यातना त्यांच्या सुखापुढे यत्किंचित आहेत. अशी साधुसंतांची भुमिका असते. आत्मरूपाचा साक्षात्कार झालेला असल्याने अंतरंगाचा ठाव घेणारी प्रगल्भता त्यांच्या मनात अटळ असल्याने जन्म मृत्यू ची बाधा त्यांच्या जवळ उरत नाही. आत्मानात्मविवेकाच्या सामर्थ्याने नश्वर देहाच्या पलीकडे ते गेलेले असतात. देहाच्या सुखदुःखाची तमा त्यांच्या जवळ नसते.

(क्रमशः)

# नामाचा अनुभव



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

# श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

**भागवत कथाकार :**
**आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर**
**कथेचे श्रवण करताना धावते संकलन**
**मधुकर बोरीकर 9403061886**

पुढे....

देवहुती ही दिति च्या उलट ती पतीच्या इच्छेविरुद्ध कधीच वागली नाही. ती पतिव्रता होती.पतीच्

या शब्दात राहणे सोपे नसते. देवहुतीच्या पोटी कपिल महामुनीच्या रूपात भगवान आले. त्यांनी आपल्या आईला उपदेश केला.

श्री ज्ञानदेव श्री तुकाराम
श्री ज्ञानदेव श्री तुकाराम

श्रीमत भागवत ही एक अलौकिक कथा आहे. ही मानवी जीवनाला पुनित करणारी कथा आहे.या ग्रंथाच्या श्रवणाने माणूस पुनित होतो. भागवत ही एक कोळशाची खाण आहे. शुद्ध अंत:करणाने आपण याचा प्रवास केला तरी पांडुरंगाचा काळा रंग आपल्याला लागल्या शिवाय रहात नाही.

भागवत आपल्याला कसे असावे? कसे असूनये? हे सर्व शिकविले. सत्संगती माणसाकरता काय करीत नाही? तसे भागवत काय करीत नाही? आपण शुद्ध अंत:करणाने याचे मनन, चिंतन, श्रवण केले पाहिजे.

आपल्याही जीवनात सुख दु:खाचे प्रसंग येतात. त्या प्रसंगी भागवतात कथेतून केलेला उपदेश आपणास आठवला पाहिजे. लोक म्हणतात हाता तोंडाशी आलेला घास गेला. त्यावेळी हे आठवावे प्रयक्ष रामावर कशी वेळ आली होती ! त्या मानाने आपले दु:ख क्षुल्लक आहे. रामचंद्र प्रभूंना आपल्या मुलाचे तोंड पहायला सुधा लव कुशासी युद्धाचा प्रसंगा पर्यंत वाट पहायला लागली.

भागवतात अनेक सुख दु:खाचे प्रसंग आहेत. लोक म्हणतात, आमच्या वडिलांनी आमचेसाठी कांहीं केले नाही. आपण कायम तक्रार करतो. माणूस स्वत:च्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडतो आणि आपल्या यशाचे श्रेय स्वत: लाटतो. हा आपला स्वभाव आहे.

भगवान कृष्ण गोकुळ सोडून गेल्यावर राधेची अवस्था फार बीकट झाली. खाण्यापिण्याचे भान नाही, सतत प्रभुचे चिंतन. क्रमशः.......



## आरोग्य संजीवनी

# म्हातारपणी गुडघेदुखी या आजाराचे कारण

ज्योतिर्मय साहित्य

३) गुडघ्याला सूज व वेदना असतील तर थंड गरम शेक करावा.

४) कच्च्या बटाट्याची पेस्ट करून गुडघ्याला त्याचा लेप दिला तर त्याचा गुडघेदुखीवर फायदा दिसून येतो बटाट्याच्या बटाट्यामुळे सांध्यातील सूज कमी होण्यास मदत मिळते.

५) ऑस्टियोआर्थरायटिस मध्येही गुळ , हळद , मेथी दाणे पावडर व तिळाचे तेल याची एकत्र पोटीस बनवून त्याचा लेप गुडघ्यावर साधारणतः ३० ते ४५ मिनिटे ठेवावे याचा लाभ मिळतो .

६) मोहरीची बारीक पावडर करून मोहरीच्या तेलात घालून त्याची पेस्ट गुडघ्यावर बांधावे याचा फायदा मिळतो .

७) गावरान भारतीय देशी गाईचे गोमूत्र लाल रंगाच्या बाटलीत १५ ते २० दिवस बंद बुच करून उन्हात ठेवावे त्या गोमुत्राने गुडघ्याला हलकेसे मसाज केले असता त्याचा लाभ होतो .

८) एक बकेट आपणास सहन होईल तेवढे गरम पाणी करून त्यात एक चमचा मॅग्नेशियम सल्फेट टाका व एक ग्लास पाणी प्यावे व डोक्यावर थंड पाण्याची भिजून टावेल ठेवावे व गरम पाण्यात गुडघ्यापर्यंत दोन्ही पाय बुडवून बसावे साधारणता पंधरा ते वीस मिनिट असे दररोज बसावे याचा गुडघेदुखी मध्ये लाभ होतो.

९) काचेचा एक ग्लास घेऊन त्यात दोन ते तीन चमचे मेथी दाणे रात्री भिजत ठेवावे व सकाळी त्या पाण्यामध्ये दोन लसणाच्या पाकळ्या टाकून थोडेसे कोमट करून अनुशा पोटी सकाळी घेतल्यास याचा फायदा होतो.याचबरोबर काळे किंवा साधे मनुके वीस नग व दोन अंजीर रात्री पाण्यात भिजत ठेवावे व एक तासाच्या फरकाने खावे.

१०) गुडघेदुखी साठी साधारणता ५० ते ६० ग्रॅम मेथी अंकुरित करून नाष्टाच्या वेळी कच्चे खाल्ले तर याचा फायदा होतो .

११) दुपारच्या जेवणात उकडून घेतलेल्या भाज्या भरपूर प्रमाणात व अंकुरित केलेले कडधान्य कोंड्यासहित भाकरी किंवा चपाती खावे थोड्यावेळाने अडीचशे ते तीनशे ग्रॅम पिकलेली पपई आवर्जून खावे याचा बऱ्याच प्रमाणात फायदा होतो .

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

१२) संध्याकाळी उकडलेल्या भाज्या किंवा कोणती फळे भरपूर प्रमाणात खावे जेणेकरून पचायला सोपे जाईल. आहारात नियमितपणे दुधी भोपळा, दोडका, पानकोबी, मेथी, शेवगा, बीट, चवळी, राजगिरा, पपई, चिक्कू, जरदाळू, सिताफळ, नाशपती असे कोणतेही हंगामी फळे खावीत गुडघेदुखी असणाऱ्या व्यक्तीने पुढील गोष्टीचा त्याग करावा टमाटे, फ्लावर, मुळा, वटाणा, आंबा, आंबट लोणचे, तेलकट मसालेदार पदार्थ, दारू, बिडी, सिगारेट, शीतपेय, चहा, कॉफी, बेसनचे पदार्थ, मैद्याचे पदार्थ, साखर, रवा, डालडा, याचा शक्यतो वापर करू नये.

१३) दररोज हलकासा शीतलीकरण व्यायाम करावा उदाहरणात खाली बसून दोन्ही पाय सरळ रेषेत ठेवा पाठीचा कणा ताठ ठेवा दोन्ही हात आपल्या कमरेजवळ जमिनीवर हाताचे तळवे ठेवा टाचेखाली थोडीशी जाडसर उशी घ्या व पायाला वरून हलकासा दाब द्या हळुवारपणे दोन्ही पाय पुढे मागे सरकवत घ्या प्राणायाम मध्ये नाडी शुद्धी प्राणायाम, ओंकार, भ्रामरी प्राणायाम करत राहावे.

वरील सर्व क्रिया योग तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली कराव्यात किंवा जवळील योग निसर्ग उपचार केंद्राचा सल्ला घ्यावा.


***

# आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





## ♦ वेताळ कथा २० (वेताळ पंचविंशती)

विस्तृत कथा (प्रसंगाला प्राधान्य दिले आहे)
एका राजाला आपल्या राज्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घ्यायचा होता. त्या निर्णयाचा परिणाम संपूर्ण राज्यावर होणार होता.
त्याने आपल्या मंत्र्यांशी सल्लामसलत केली. सर्वांनी वेगवेगळे मत मांडले. राजा द्वंद्वात पडला. शेवटी त्याने विचारपूर्वक एक निर्णय घेतला.
काळानुसार त्या निर्णयाचे काही चांगले आणि काही कठीण परिणाम झाले.
राजा पळून गेला नाही.
त्याने त्या परिणामांना स्वीकारले आणि त्यातून शिकत राहिला.
वेताळाने विचारले - राजा महान कशामुळे ठरला?
राजा विक्रम म्हणाला - "ज्याने निर्णय घेतला आणि त्याच्या परिणामांची जबाबदारी स्वीकारली, तोच खरा महान."
मनाचा विसावा स्तर (गूढ संबंध)
या कथेत "निर्णयाची जबाबदारी आणि परिणाम स्वीकार" दिसतो.
१: निवड : निर्णय घेण्याची वेळ. २: शंका : योग्य की अयोग्य? ३: निर्णय : एक मार्ग निवडणे.
४: परिणाम : निर्णयाचे फल ५: स्वीकार : परिणामाला होकार देणे.
▪ अंतर्मन चिंतन : मी निर्णय घेतल्यानंतर परिणाम स्वीकारते का? की टाळण्याचा प्रयत्न करते?
"निर्णयाची जबाबदारी स्वीकारणे हीच परिपक्वता आहे."
सगळ्या प्रसंगात साधक बाधक चिंतन खूप आवश्यक असते अन्यथा चूक घडू शकते. ताबडतोब किंवा घाईघाईने घेतलेला निर्णय योग्य नसतो हे सुचवण्यासाठी हे वेगवेगळे प्रसंग व त्यातून उलगडणारे मनाचे स्तर स्पष्ट होतात
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# गृहित धरणे.... (वेदांचे वाचन मननाने घडलेले काही चिंतन...)

**ज्योतिर्मय साहित्य**

''न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो-
न हन्यते हन्यमाने शरीरे ।।

गृहित धरणे अगदी सहज प्रक्रिया असते. जन्माच्या क्षणापासून ती सुरू असते. (आधीही ती असतेच हे नंतर लक्षात येतं!) सहजपणे व्यक्ती एक गोष्ट लक्षात ठेवून म्हणजेच गृहीत धरुन जीवन जगत असतो. उदाहरणार्थ आईशी आत्मीयता, तळमळ, प्रेम असते जे नंतर आपोआप त्याच्या सहज स्वभावात परिवर्तित होतं. शिक्षण हेच घ्यायचं असंच वागायचं हाच निर्णय योग्य हे करत असताना आधीच पेरून ठेवलेल्या कल्पना, वस्तू, व्यक्तीच त्याच्या आधार असतात. तसंच तो सहजतेने आपले कार्य करत असतो. सगळं सुरळीत असतं पण अचानक गृहित धरलेली एखादी साखळी कमी पडली, तुटली तर मात्र चिडतो व आक्रमक भूमिका घेतली जाते. आता मात्र संघर्ष अटळ असतो व या संघर्षातूनच खरे दुर्भाग्य, दुःख सुरू होते. या दुःख संकल्पनेवर आधारीत दुःखांची न संपणारी मालिका सुरू होते.

कारण पाया हा तसेच विचार व कृती करण्यास भाग पाडतो. वेगळा काहीही विचार नसल्याने या संकटातून बाहेर पडणे व्यक्तीला शक्य नसते. तळमळ, चिडचिड, क्रोध, संताप, असूया, द्वेष, तुलना हेच या पायाभूत दुःखाचे फलित असते, ज्यातून बाहेर पडणे केवळ अशक्य असते.

मीच का? मला च का? माझे काय चुकले ह्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत व तळमळ वाढते. ही अवस्था कशी संपेल असे सखोल चिंतन सुरू होते, ते ही अतिशय सहजतेने, नैसर्गिकरीत्या तेव्हा आपण काहीतरी गृहीत धरले जी आपलीच चूक आहे, असे लक्षात येते. मग त्याच क्षणी दोषारोप थांबून स्वतः चे अवलोकन केले असता आपला विचारांचा मार्ग वेगळा आहे, ज्यात या वस्तू, हे लोक, हे विचार अडथळा आहेत, त्यांना हे समजणे शक्य नाही, मला काहीतरी वेगळं हवंय जे ह्यातून मिळूच शकत नाही, हे जाणवलं की मग गृहीतकंच बदलतात. आपला मार्ग शोधण्यासाठी आपणच एकटे आहोत पण समर्थ आहोत. आपले संकल्प, इच्छा पूर्ण करण्यासाठी खूप मोठा आधार आतच आहे ज्याला आत्मविश्वास म्हणतो. तो जागृत होतो व स्वतःची स्वतःचा आधार, चांगल्या वाईट फळांचा स्वीकार इतरांवर दोषारोप न करता करतो.

**॥ अध्यात्म ॥**
**अपर्णा परांजपे**
**पुणे मो. 95030 45495**



गृहित धरणं ही आपली अपेक्षा इतरांवर न लादता आपली जबाबदारी आपणच घेतो व आत्मविश्वासाने पुढे जातो. हा जो प्रवास आहे ती परमेश्वराने दिलेली च सगळ्यात मोठी देणगी मुक्त इच्छा असते ज्याचा वापर आत्मविश्वास जागृत झाल्यावर करता येतो.

जमिनीच्या आत बीज दुभंगून रोपटे जसे डौलदार बाहेर पडते तद्वतच तो आनंदाने उल्हसित होतो स्वयंस्फूर्तीने!

बुध्दी ही मायिक आहे, मर्यादित आहे, देहासोबत तयार झाली आहे त्यामुळे तिच्या कक्षेप्रमाणे विचार होणे सहज शक्य आहे त्याप्रमाणे वागणे हे ही योग्य आहेच पण ते अंतिम सत्य नसल्याने निराशा पदरी पडते. ही निराशा म्हणजेच जमिनीतल्या बीचाचे फुटणे! निराशा, दुःख, व्याकुळतेतूनच खऱ्या सुखाचा शोध घेतला जातो, तोच ''आतला'' आत्मविश्वास असतो!

याला विचारांचे शुध्दीकरण म्हणता येईल! आत असलेले शाश्वत तत्व त्याचा मार्गदर्शक, आधार ठरतं! आतूनच कौतुक व आतूनच शिक्षा अनुभवत वरून मात्र डेरेदार वृक्ष तयार होतो जो काहीही गृहित न धरता इतरांना आधार देण्यात समाधान मानतो. स्वधर्म म्हणजे हेच समाधान, जे तो धर्म समजतो त्यापेक्षा आमूलाग्र बदललेले पण तरीही आपलेसे भासलेले असते. सुख हे घेण्यात नसून देण्यात असते हे पारंपरिक गृहितक मोडल्याचे शाश्वत समाधान त्याला अर्थातच चिरकाल आनंददायी असते.

ह्यालाच वेदांत ''मुक्ती'', ''मोक्ष'' म्हणत असेल, नाही का? भगवंत हृदयस्थ आहे

# भेटींत रुष्टता मोठी........

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

हे अर्णवने बोलून दाखवल्या पासून आईने त्याला कधीही कुठल्या बाबतीत फोर्स केला नाही. कारण लहानपणीच त्याच त्याला कळायचं की त्याला काय पाहिजे काय नको. त्याला खूप पायलट व्हायची इच्छा होती पण टेन्शन घेणं नको होतं त्यामुळे त्याने आईच्या आग्रहाखातर मेकॅनिकल पूर्ण केले. अर्णव साडेचार वर्षाचा होता तेव्हाच त्याला पहिलीला ऍडमिशन मिळत होती. पण घेतली नाही कारण कुठेतरी असं आईला वाटलं की जे लहानपण त्याला एन्जॉय करायचे ते त्याच्यावरती अभ्यासाचा लोड टाकून नको करायला. त्यानंतर बारावीला त्याला स्कॉलरशिप व एक वर्षाची जंप मिळाली त्यामुळे तो इंजिनिअरिंग चार वर्षाचे ऐवजी तीन वर्षातच झाला. त्यानंतर त्याचे मास्टर्ससाठी त्याला एक वर्षाचा कोर्स मिळत होता पण तेव्हा कोविड असल्यामुळे त्याला दोन वर्षाचा कोर्स घ्यायला लागला कारण तेव्हा सर्व फैमिली इंडियात आलेली होती. आणि इंडियातून एक वर्ष ऑनलाईन करण्यापेक्षा एक वर्ष ऑनलाईन आणि एक वर्ष तिथे जाऊन करणं हे सर्वांना जास्त सोयीस्कर वाटले. तसेच अर्णव मास्टर्स मध्ये अंडरग्राउंड ला सगळ्या विषयात डिस्टिंगशन मध्ये पास झालेला आहे. त्याला युएस ला अजिबात जायचं नव्हतं त्यामुळे त्याने जीआरई दिलीच नाही. दिली असती तर टॉप युनिव्हर्सिटी मध्ये ऍडमिशन मिळाली असती. अर्णवला सिंगापूरला,लंडन ला मास्टर्स साठी एडमिशन मिळालेली होती. अर्णवला कॅनडाला जायचे असल्याने त्याने टोरांटोला प्रवेश घेऊन




मास्टर्स पूर्ण करीत तिथेच जॉब स्वीकारला आहे आणि आता तो जॉब करतो आहे. अर्णव पक्का स्पोर्ट्समन आहे. तो शाळेत स्विमिंग मध्ये नॅशनल लेवलला गेलेला असून अजूनही त्याचे स्विमिंग चालू आहे. स्पोर्ट्स मध्ये आत्तासुद्धा तो टोरांटो मध्ये आहे तिथे तो हाफ मॅरेथॉन सुद्धा मागच्या वर्षी पळाला आहे. यावर्षी मे मध्ये पुन्हा मॅरेथॉनसाठी त्याची तयारी चालू आहे. तो उत्तम स्किट करतो बर्फामध्ये. दररोज त्याचे रनिंग जिम चालूच असते. सध्या तो टोरांटो मध्ये एका ऑस्ट्रेलियन कंपनीमध्ये काम करत आहे.

९ मार्चला अर्णवची आणि माझी भेट उत्कर्ष प्रकाशन मध्ये झाली. सु वा जोशी हे स्कूटी कलंडल्यामुळे पडले आणि पाय थोडा सुजला होता. मी मेडिकलमधून त्यांना बजरंगी आयुर्वेदिक लेप लावण्यासाठी घेऊन दिला. अर्णव कंपनीचे काम वर्क फ्रॉम होम करत होता. त्याला कळल्यावर लगेच तो उत्कर्ष मध्ये आला आणि आजोबांना स्कूटीवरून घरी पोहोचवण्यासाठी घेऊन निघाला. मी पण निघालो होतोच. आपला नातू घरी घेऊन जातोय हा वेगळाच आनंद त्यांच्या चेहऱ्यावर मला दिसत होता. दीनानाथ हॉस्पिटलच्या रस्त्यावर मी त्या दोघांचे फोटो काढले. ८६ व्या वर्षी स्कूटीवर एक पाय तरंगता ठेवून हसतमुख चेहऱ्याने आपल्या नातवाच्या बरोबर जाताना मी सु वा जोशी यांना पहात होतो. नातवाबरोबर पाय दुखत असताना सुद्धा स्कूटीवर बसून आनंद घेत असलेले आजोबा मला बघायला मिळाले.

**शिरीष चिटणीस**
**सातारा ७५८८८६५०५१**



घरातील सर्वजण सु वा जोशी यांना सांगतायेत कि, स्कूटीवर प्रवास करू नका. पण ते ऐकत नाहीत. दुकानात येऊन ग्रंथ विक्रीचा आनंद घेणे तसेच साहित्यिकांशी व वाचकांशी गप्पा यामुळे त्यांना मिळणारा निर्भेळ आनंद त्यांचे आयुष्यमान वाढवतेय यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. उत्कर्ष प्रकाशन दुकानाच्या वरच्या मजल्यावर फ्लॅट घेण्याच्या तयारीत ते असून कायमच उत्कर्ष प्रकाशन आणि ग्रंथ विक्रीच्या सानिध्यात त्यांना राहायचे आहे. अर्णव ११ फेब्रुवारी ते १३ मार्च आपल्या आजी - आजोबांना भेटण्यासाठी खास आला हे आपणा सर्वांना मार्गदर्शक आहे. १४ मार्चला अर्णव कॅनडाला टोरांटो येथे पोहचला. आजी-आजोबा यांच्याबरोबर वेळ व्यतित करण्यात नातवांना मिळणाऱ्या आनंदाचे मोल कशातही न मोजता येण्यासारखे आहे. मी हा अनुभव प्रत्यक्ष बघीतला आणि माझे मन प्रफुल्लित झाले.

नुकताच माझा आठ वर्षाचा नातू शिवांक पुण्यात सुट्टीत आमच्याकडे येऊन गेला. नातवांची भेट होणे आणि त्यांच्याबरोबर वय विसरून खेळणे हे आजी-आजोबांचे सर्वात आवडते काम. नातवांच्यात वेळ कसा जातो हेच कळत नाही. आठ दिवसांपूर्वी माझ्याशी खेळता खेळता शिवांकने माझा मोबाईल घेतला आणि चालू केला. माझ्या मोबाईलच्या स्क्रीनवर वॉलपेपरवर त्याला त्याच्या मामाचा फोटो दिसला. तो मला म्हणालाआज्जू वॉलपेपरवरचा मामाचा फोटो काढ आणि माझा लाव. त्याचा फोटो माझ्या मोबाईलच्या स्क्रीनवर विराजमान होईपर्यंत तो काही माझ्यापासून हलला नाही. असा मिळणारा आनंद आजी-आजोबांना आनंदाने उर्वरीत आयुष्य जगण्यासाठी बळ देत असतो. तो पुण्यात असेपर्यंत नेहमीप्रमाणे त्याला ऐक्सेस स्कूटर वरून रोज चक्कर मारणे तसेच आमच्या सृष्टी अपार्टमेंट समोर असणाऱ्या धनलक्ष्मी स्टोअर मधून एक तरी खेळणे घेणे हे आनंदाचे सोपस्कार पूर्ण करावे लागतातच.

# वस्तू वस्तू जपून ठेव...

## ५. टिक टिक



सध्या लहानमुलांसाठी खूप आकर्षक म्हणजे अगदी मोठ्या माणसांना सुद्धा भुरळ पडावी अशी खेळणी दिसून येतात. ती खूप महाग पण असतात. काही खेळणी ज्ञान वाढवणारी असतात. परंतु साधारण चाळीस वर्षांपूर्वी एक लोकप्रिय असलेले खेळणे मला आठवते. त्याची किंमत असेल दहा किंवा पंधरा पैसे. पण मुलांच्या दृष्टीने उपयुक्त! त्याचे नाव "टिक टिक किंवा टीन क्लिकर"

या वस्तूला 'कडकडी' सुद्धा म्हटले जाते. इंग्रजीत याला 'Metal Clicker' किंवा 'Cricket' असेही नाव आहे. खेळणी म्हणून: ८० च्या दशकातील मुलांचे हे सर्वात आवडते आणि स्वस्त खेळणे होते. अंगठ्याने तो धातूचा पत्रा दाबला की 'कडक' असा आवाज येतो, म्हणून मुले याचा वापर गंमत म्हणून किंवा एकमेकांना खुणावण्यासाठी करत असत.

फार कमी लोकांना माहीत आहे की, अशा प्रकारच्या क्लिकरचा वापर दुसऱ्या महायुद्धात अमेरिकन सैनिकांद्वारे (विशेषतः पॅराट्रूपर्स) रात्रीच्या वेळी अंधारात एकमेकांना सांकेतिक संदेश देण्यासाठी केला जात असे. एकदा 'क्लिक' केल्यास उत्तर म्हणून दोनदा 'क्लिक-क्लिक' करणे, ही त्यांची ओळख पटवण्याची पद्धत होती.

■ निर्मिती

हे खेळणे लवचिक स्प्रिंग स्टील (Spring Steel) किंवा कथील (Tin) च्या पातळ पत्र्यापासून बनवले जाते.

एका छोट्या धातूच्या चौकटीत किंवा डबीत हा पत्रा अशा प्रकारे बसवलेला असतो की तो थोडा फुगीर राहतो.

जेव्हा आपण या पत्र्यावर दाब देतो, तेव्हा तो आपला आकार बदलतो आणि पुन्हा मूळ स्थितीत येताना हवेच्या दाबामुळे एक विशिष्ट 'टीक' आवाज निर्माण होतो. सुरुवातीला हे अगदी साधे पत्र्याचे असायचे. कधीकधी तो पुढचा पातळ पत्रा हाताला लागायचा. किंवा ते खिशात ठेवले की पत्र्याच्या टोकामुळे खिशाला छिद्र पडायचे. पण कोणालाही कळू न देता मित्रांना संकेत द्यायला उपयोगी होते.

मुले फक्त मजेसाठी हा आवाज काढत असत. खेळताना (उदा. लपाछपी किंवा पकडापकडी) एकमेकांना दूरून संकेत देण्यासाठी किंवा बोलावण्यासाठी याचा वापर व्हायचा.

गाणी म्हणताना किंवा ठेक्यावर वाजवण्यासाठी मुले याचा वापर करत.

काही मुले हे आपल्या सायकलच्या हँडलला लावून बेलसारखा वापर करायची.

नंतर या साध्या दिसणाऱ्या टिकटिकला आकर्षक रंग लावून किंवा काही प्राण्यांचे आकार देऊन रंगीबेरंगी करुन आकर्षक केले गेले.

याच्या आवाजाच्या मदतीने कुत्र्यांना प्रशिक्षण दिले जात होते.

हे खेळणे आता दुर्मिळ झाले असले तरी, आजही जत्रेत किंवा जुन्या वस्तूंच्या दुकानात पाहायला मिळते.

- विभावरी कुलकर्णी
8087810197

# ओळख साहित्यिकांची



## सौ. शीतल शैलेश गायकवाड

माझं नाव सौ. शीतल शैलेश गायकवाड.

शिक्षणाने मी मास्टर इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट (M.C.M.) आहे. शिक्षण पूर्ण होताच मी स्वतःच्या सॉफ्टवेअर कंपनीची मुहूर्तमेढ रोवली.

अँड्रॉइड मोबाइल ॲप्लिकेशन डेव्हलपमेंटच्या क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत राहिले, एवढेच नव्हे, तर अँड्रॉइड तंत्रज्ञान नव्यानेच उदयास येत असताना त्याचे प्रशिक्षणही दिले.

लहानपणापासूनच वाचनाची ओढ माझ्या मनात घर करून होती. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात या आवडीला अधिकच खोली आली.

व. पु. काळे, पु. ल. देशपांडे, शिवाजी सावंत यांसारख्या दिग्गज साहित्यिकांच्या शब्दांनी माझ्या संवेदनांना आकार दिला. भगवद्गीतेने तर माझ्या विचारविश्वाला एक स्थिर आधार दिला — तो ग्रंथ आजही माझ्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे.

लेखणीशी माझी पहिली ओळख शाळेतच झाली. कविता, लेख — शब्दांच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्याचा तो प्रयत्न शाळेच्या आणि महाविद्यालयाच्या वार्षिक अंकांतून वाचकांपर्यंत पोहोचला. मात्र, जगण्याच्या व्यग्र वाटचालीत लेखन मागे पडत गेले. काही वर्षांपूर्वी आमचे स्नेही श्री. शिरीष चिटणीस व सौ. शिल्पा चिटणीस यांनी माझ्यातील लेखकाला पुन्हा हाक दिली. त्यांच्या आग्रहाने आणि अखंड प्रोत्साहनाने माझ्या सुप्त शब्दांना पुन्हा एकदा धुमारे फुटले.

“ज्योतिर्मय” या व्यासपीठाने त्या शब्दांना योग्य ती दिशा आणि विस्तार दिला.

कुटुंबाच्या उबदार साथीने आणि स्नेहींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने माझा हा लेखनप्रवास अधिकच समृद्ध होत आहे. त्या सर्वांप्रती मी मनःपूर्वक कृतज्ञ आहे. 🙏





**काय म्हणता SIP केलेलं नाही....!**

*नमस्कार मंडळी....*
*तुमचा नववर्षाचा नवा संकल्प काय आहे?*
*तुमचा नववर्षाचा संकल्प दि.१५ जानेवारीला मोडून पडलेला असेल? (....पण मोडू नये म्हणून माझ्या शुभेच्छा)... असो.*
*व्यायामाचे वेळापत्रक हरवले...*
*डायेटींगचे, वजन कमी करण्याचे प्लॅनिंग फसलेले....*
*रोजनिशी लिहिणे ठरवले पण त्यासाठी ३६५ पानांची वहीच मिळाली नाही.....*
*असे सगळे होणार असेल...(खरं तर होऊ नये)*
*पण तुमचे SIP मात्र बंद पडता कामा नये याची पुरेपूर काळजी घ्या.*
*काय म्हणता SIP केलेलं नाही....*
*मग SIP लगेच करा... त्याचा संकल्प नको.*
*म्हटलेच आहे ना, "कल करे सो आज कर, आज करे सो अब......"*
*माझा नंबर वर आहेच. आत्ताच फोन करा.*
*नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा....*
*येणारे नवे वर्ष तुम्ही केलेल्या SIP ने समृद्ध असो.*





**दान देणे, हास्य देणंही महत्वाचे.**

भारत व आशियातील सर्वात मोठ्या पोलाद कारखान्याचा मालक व प्रसिद्ध उद्योगपती
रतनजी टाटाला कोण ओळखत नाही? ते दान देण्यात अग्रगण्य होते.
दान-धर्म हा वेगळा व अध्यात्मिक विषय, पण इथे आपण त्यामुळे होत असलेला आनंद व औदार्य याबाबत बोलूया, कोणी कुणा काय द्यावे, किती द्यावे. हा तर वैयक्तिक प्रश्न.. बरोबर ना.. पटत का.. पण या टाटानी नेहमी पैशानीच नव्हे तर आपल्या अनुभव, दानानेही मदत केली. त्याना प्रश्न विचार
ला गेला. सर तुमच्या जीवनात आनंदी क्षण कोणता, तेव्हा ते म्हणाले, "जीवनात मी चार
टप्पे पार केले, पण खरा आनंद मला चौथ्या वेळी मिळाला. पहिल्यादा संपत्ती व मान, दुसर्या, तिसर्या वेळी वस्तू, मौल्यवान दागदागिने, मोठ्ठे प्रकल्प पूर्ण केले.. पण खरा आनंद मला चौथ्यावेळी मिळाला, तो शब्दातित आहे.
मी एका अपंग मुलाच्या संस्थेत 200 व्हिलचेअर दिल्या.. त्यावेळी मला कल्पनातीत आनंद झाला..
सर्व मुले व्हिलचेअरवर बसून खेळत होती, एका मुलाने माझे पाय घट्ट धरले, मी त्याला म्हणालो, अजून काही पाहिजे का, तेव्हा तो म्हणाला, "मला तुमचा चेहरा लक्षात ठेवायचा
आहे, जेव्हा मी स्वर्गात जाईन व तुम्हाला ओळखू शकेल व पुन्हा एकदा आभार मानू शकेल."तर हा खरा आनंद..
आज थांबतो. ऊद्या पुन्हा भेटू.. गूड डे!


*साहित्यिक मित्रांनो,*
*आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ*
॥ज्योतिर्मय॥ साहित्याचे विद्यापीठ
*"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.*
*साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!*
*हो जाओ शुरु....*
*या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.*
*- संजय व्यापारी, संपादक 7743918559*
*ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ*



**ऑनलाईन औषधोपचार**



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

# कलागुण-आनंदी जीवन जगण्यासाठी

**ज्योतिर्मय साहित्य**

गौरीशंकर एज्युकेशन सोसायटी संचलित कला महाविद्यालयाचे २९ वे वार्षिक कला प्रदर्शन नेहमीप्रमाणेच दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था यांचे सहकार्याने दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल येथे २०, २१, व २२ मार्च रोजी कलारम्य वातावरणात उत्साहात पार पडले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे येथील कमर्शियल आर्टिस्ट, फोटोग्राफर लेखक-कवी कौस्तुभ गोगटे तसेच गायिका व ऑस्ट्रेलियन ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट ची साउथ आशियाची डायरेक्टर स्वरदा चिटणीस-कुळकर्णी यांच्या हस्ते झाले. या कला महाविद्यालयाचे बरेच माजी विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कॉलेजची माजी विद्यार्थिनी सृजनशील कलाकार ऋतुजा लोहार कायमच कॉलेजच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी योगदान देत असते. तिच्याही कलाकृती या प्रदर्शनामध्ये मांडलेल्या होत्या. ती म्हणाली... या प्रदर्शनातून माझ्या कलाकृतींना जाणकार रसिक प्रेक्षकांकडून मिळत असलेला प्रतिसाद माझ्यासाठी खूप महत्वाचा आहे.अशा प्रदर्शनामुळे कलाकारांना स्वतःची कला लोकांसमोर मांडण्याची संधी मिळते आणि त्यातून आत्मविश्वास तसेच ओळख वाढते. माझ्या सोबत इतर माजी विद्यार्थ्यांचा सहभाग असल्यामुळे हा अनुभव आणखी खास झाला. एकत्रीतपणे विविध कलाकृती पाहताना नव्या कल्पना बघून त्यातून प्रेरणा आणि नवीन शिकण्याची संधी मिळाली. एकूणच हे प्रदर्शन माझ्यासाठी आनंद आणि नव्या उर्जेचा सुंदर अनुभव ठरलं.

ऋतुजा लोहार गेल्या ५-६ वर्षापासून त्यांच्या कला विद्यालयाच्या कलाप्रदर्शनाच्या बातम्याही तयार करून देते. या कलाप्रदर्शनाची बातमी मी तीला तयार करून देण्यासाठी सांगितले. खरंतर ऋतुजा बातमी लगेच तयार करून देते पण यावेळी मात्र तिच्याकडून त्या दिवशी उशीरा म्हणजे रात्री ८ ते ८.३० वाजता मला बातमी व्हॉट्सअॅपवर मिळाली. तीचा फोन आला... ती म्हणाली सर,एका आर्किटेक्ट कडून



तातडीने टेराकोटा प्लेटसवर डिझायनींग पेंटीग्ज द्यायची असल्याने मला बातमी देण्यास उशीर झाला. बातमी सोबतच तिने टेराकोटा प्लेटसवर पेंटींग्ज केलेले कलाकुसरीचे फोटोज पाठविले. टेराकोटाच्या बऱ्याच प्लेटस तिने डिझाइन-पेटींग्ज केलेल्या होत्या. प्रत्येक प्लेटसवर वेगळे डिझाइन होते. बहुतेक ऋतुजा दिवसभर एकाग्रतेने हेच काम करीत होती.

या प्लेटस बघून मला जाणवत होते कि, ऋतुजाने या प्लेटसवर केलेल्या डिझाइन-पेंटीग्ज मध्ये स्वतःच्यी सर्जनशीलता आणि भावनांची एक अभिव्यक्ती प्रकट केली आहे. प्रत्येक प्लेटवर तिने हाताने वेगवेगळे डिझाइन्स तयार केले आहेत. या डिझाइन्समुळे तिने निसर्गातील साध्या पण सुंदर पानांची फुलांची वेलींची दृष्टचित्रे मनात साठवून ती सूक्ष्म आणि एलिंगट रूप रेषांमधून प्लेटसवर साकारलेली आहेत हे जाणवत होते. ऋतुजाने प्रत्येक प्लेटवर डिझाइन करताना त्यात एक वेगळेपणा आणि जिवंतपणा आणला आहे. या डिझाइन केलेल्या प्लेटस भिंतीवरील मोकळ्या जागेत लावल्यानंतर ती भिंत आकर्षित तर वाटेलच पण ज्या जागेवर त्या लावल्या जाणार आहोत त्या जागेची बघणा-याच्या मनात एक खास ओळख आणि कलात्मक स्पर्श नक्कीच घडवणार आहेत. प्रत्येक डिझाईनमध्ये ऋतुजाने कल्पनाशक्ती, मेहनत आणि प्रेम गुंफलेले आहे. ज्यामुळे तिने सजवलेल्या टेराकोटा प्लेटस ज्या घरात लागणार आहेत त्या घरात त्या सजावटीपुरत्या मर्यादीत न राहता त्या घराला एक उबदार आणि सुंदर वातावरण देणाऱ्या ठरणार आहेत.

कला प्रदर्शनाच्या उद्घाटनाच्या मनोगतात स्वरदा चिटणीस




-कुळकर्णी सांगत होती... आमच्या काळात म्हणजे, जेव्हा मी दहावी उत्तीर्ण होऊन २००५ साली सायन्स साइडला प्रवेश घेतल तेंव्हा सायन्स, कॉमर्स या साइडला प्रवेश मिळविण्यासाठी परसेंटेज ज्यादा लागत असे. पण गेल्या दोन दशकात शिक्षण क्षेत्रात प्रचंड उलथापालथ होत आहे. सध्या सर्वात जास्त मेरीट आर्ट्स साईडच्या प्रवेशासाठी लागते. मी ऑस्ट्रेलियन गव्हर्नमेंट मध्ये साऊथ आशियाची फायनान्स डायरेक्टर म्हणून जॉब करते. कलाक्षेत्रामध्ये तरुण पिढीला प्रचंड संधी प्राप्त होत आहेत. कलाक्षेत्रामध्ये, साहित्यक्षेत्रामध्ये विद्यार्थी जेवढा अभ्यास करतील, संशोधन करतील आणि आपली अभिव्यक्ती प्रकट करतील तेवढी त्यांना मिळणारी संधी पैसा आणि समाधान या स्वरूपात अमर्यादित आहे. आर्टसच्या बाजूला स्वतःची करीअर करण्यासाठी देशात-परदेशात मिळणाऱ्या संधी प्रचंड आहेत.

याचा अनुभव मला लगेचच सर्जनशील कलाकार ऋतुजा लोहारने केलेल्या वैशिष्ठपूर्ण डिझाईन आणि पेंटीग्जमधून आला. अकराव्या शतकातल्या एका चिनी ग्रंथात कलांची यादी पुढील प्रमाणे दिली आहे: विधिसंस्कार, संगीत, धनुर्विद्या, रथविद्या, चित्रकला (लेखनकला हिच्याच पोटात येते), आणि पद्यरचना.विशेषतः आपण जेव्हा चित्रकार बघतो किंवा त्याची चित्रे पाहतो तेव्हा त्या चित्रकाराच्याकडे असणारा संगीताकडे, नाटकाकडे, कवीतेकडे साहित्याकडे असणारा दृष्टीकोन आणि ओढा त्याच्या चित्रांमध्ये दिसून येतो. कवी आणि चित्रकार अशी एकच असणारी व्यक्तिमत्वेही आपल्याला बरीच दिसून येतात. विशेषतः लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या माझ्या दोन प्राथमिक आणि तीन माध्यमिक शाळांमध्ये संगीत, वर्क्तृत्व, चित्र, नाटक,अवांतर वाचन याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष असावे यासाठी अभ्यासाबरोबरच जास्त प्रयत्न शिक्षक व इतर करत असतात. हे कलागुण आयुष्यात आनंदी जीवन जगण्यासाठी उपयोगी पडत असतात.

# रंगभूमी दिनानिमित्त नाट्यसंवाद प्रशिक्षण शिबिर, घर दोघांचे एकांकिकेचेही सादरीकरण

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील कला सादरीकरण विभागात (डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स) जागतिक रंगभूमी दिनानिमित्त नाट्यसंवाद शिबिराचे आयोजन करण्यात आले तसेच घर दोघांचे एकांकिकेचेही सादरीकरण करण्यात आले.

२ प्रादर्शिक कला विभागामध्ये नाट्य संवाद प्रशिक्षण शिबिर पार पडले. यासाठी सुप्रसिध्द सिने,नाट्य अभिनेते,लेखक मा.ओंकार गोवर्धन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रशिक्षण हे नाटासाठी अंत्यत आवश्यक आहे . असे मत प्रतिपादन करताना विभागाच्या दैदिप्यमान इतिहासाची आणि वर्तमानाची प्रशंसा केली. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजनाने झाली. यावेळी विभागप्रमुख प्रा डॉ.वैशाली बोदेले यांनी प्रास्ताविक करताना जागतिक रंगभूमी दिनाचे महत्त्व आणि विभागाचे जागतिक पातळीवरील योगदान यावर प्रकाश टाकला. यानंतर आशिष देव लिखित आणि सिध्देश्वर थोरात दिग्दर्शित '' घर दोघांचं '' या एकांकिकेचा प्रयोग संपन्न झाला. आजच्या आधुनिक काळात प्रेमाच स्वरूप बदलले असताना



त्यागाची भावना आणि शारीरिक नव्हे तर मानसिक पातळीवरील प्रेम कसे पारदर्शक व व्याकूळ करणारे असते याची प्रचिती या एकांकिकेतून अनुभवास आली. विभागाच्या संपन्न झालेल्या पन्नासाव्या सुवर्ण मोहत्सवी नाट्य महोत्सवात जाहीर केल्या प्रमाणे स्व. प्रा.डॉ.रुस्तुम अचलखांब, स्व.प्रा.डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर आणि स्व.प्रा. कुमार देशमुख यांचे कार्य कर्तृत्व आणि आठवणींना उजाळा मिळून विद्यार्थ्यांना या वरील गुरुजनांच्या नावातून सतत ऊर्जा आणि प्रेरणा मिळण्यासाठी, त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ.संतोष गालफाडे यांच्या तर्फे प्रदान केला जाणारा '' सिन्सियर आर्टिस्ट ऑफ द इअर '' हा पुरस्कार विभागाचा गुणी विद्यार्थी कलावंत सुमित सोळंके याला तर प्रा. प्रदीप कांबळे आणि डॉ.विशाखा शिरवाडकर यांच्या तर्फे प्रदान केला जाणारा '' बेस्ट डीसिप्लीन डायरेक्टर अवॉर्ड '' हा पुरस्कार सौरभ मोरे आणि साधना विठोरे या विद्यार्थी कलावंतांना मा. ओंकार गोवर्धन , प्रा.डॉ.वैशाली बोदेले, डॉ. स्मिता साबळे,डॉ.गजानन दांडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी विभागातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी आणि प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती महाराणी ताराराणी पुस्तकाचे दिल्लीत प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे- छत्रपती महाराणी ताराराणी यांचे हिंदवी स्वराज्य टिकवण्यात मोठे योगदान आहे, असे मत युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य टिकवण्याचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी आपलीच आहे, या भावनेतून त्यांनी छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्यानंतर स्वराज्य टिकवण्याचे कार्य केले. त्यांच्याकडे उत्तम युद्ध आणि प्रशासकीय कौशल्य होते, ज्याच्या जोरावर त्यांनी औरंगजेबाशी सात वर्षे लढा दिला.

महाराणी ताराराणींचे हे कार्यकर्तृत्व समाजापर्यंत पोहोचू शकले नाही. छत्रपती महाराणी ताराराणी या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांचे महात्म्य आणि स्वराज्य टिकवण्यासाठी केलेला संघर्ष समाजापर्यंत पोहोचेल, असा विश्वास युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी व्यक्त केला.

सरहद पुणे, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली आणि मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्ली येथे महाराणी ताराराणी यांच्या ३५१व्या जयंती वर्षानिमित्त महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले




होते. या निमित्ताने गुरुवारी (दि. २) छत्रपती महाराणी ताराराणी या पुस्तकाचे प्रकाशन आणि महाराणी ताराराणी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी युवराज संभाजीराजे छत्रपती बोलत होते.

हा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात पार पडला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, सरहदचे संस्थापक संजय नहार, विश्वस्त डॉ. शैलेश पगारिया, शैलेश वाडेकर, अनुज नहार, पुस्तकाचे लेखक मयूर मसूरकर आणि गोपाळ कांबळे मंचावर उपस्थित होते. पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण सोहळ्याने दिल्ली येथे आयोजित संमेलनाच्या कार्याचा शुभारंभ झाला.

या सोहळ्यात अबोली राऊत, डॉ. लीना बोकील, ममता सपकाळ, मेजर डॉ. मोनिका बारणे, अंजू माने, साधना चव्हाण, सुवर्णा गोखले, आशा खेडकर, अलका गुनजाळ आणि स्वाती डिंबळे यांना छत्रपती महाराणी ताराराणी सन्मानाने गौरवण्यात आले.

छत्रपती महाराणी ताराराणी यांचे कार्य प्रेरणादायक असून त्यांचे युद्ध आणि प्रशासकीय कौशल्य युवा पिढीला मार्गदर्शक ठरेल, असे युवराज संभाजीराजे छत्रपती म्हणाले. समाजाचे देणे लागतो या भावनेतून कार्यरत असलेल्या सन्मानित महिलांचे कार्य अभिनंदनीय आहे. विघातक समाजासाठी विधायक कार्य होणे आवश्यक आहे आणि या सन्मानार्थी महिला महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांच्या वारसदार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रास्ताविकात सरहदचे संस्थापक संजय नहार यांनी मुंबईतील मंत्रालयात आणि दिल्लीतील महाराष्ट्र सदनात छत्रपती महाराणी ताराराणी यांचे तैलचित्र नसल्याचे निदर्शनास आणले.

यावर युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी प्रतिक्रिया देत सांगितले की, मंत्रालयात आणि महाराष्ट्र सदनात छत्रपती महाराणी ताराराणी यांचे तैलचित्र लावण्यासाठी ते मुख्यमंत्र्यांना फोन करतील. तैलचित्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याबरोबरच वेळप्रसंगी त्यांच्यावर दबाव टाकण्याची भूमिकाही घेईल, असे त्यांनी जाहीर केले.

# रितेश विलासराव देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी'चा फर्स्ट लूक टीझर डिजिटलवर; भव्य स्टारकास्टमुळे उत्सुकता शिगेला

**ज्योतिर्मय साहित्य**

जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित 'राजा शिवाजी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा 'फर्स्ट लूक टीझर' अखेर डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. नुकताच 'धुरंधर: द रिव्हेंज' या चित्रपटासोबत चित्रपटगृहांमध्ये विशेषरीत्या प्रदर्शित करण्यात आलेल्या या टीझरला थिएटरमध्ये टाळ्या आणि जल्लोषाचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. सोशल मीडियावरही प्रेक्षकांनी टीझर बद्दल प्रतिक्रिया दिल्या होत्या. आता हाच टीझर डिजिटल माध्यमातून प्रदर्शित होतो आहे, भारताच्या सर्वश्रेष्ठ महान अश्या राजाची भव्य झलक अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असून, चित्रपटाबाबतची उत्सुकता अधिकच वाढली आहे.




'राजा शिवाजी' हा चित्रपट छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असून त्यांच्या पराक्रम, स्वाभिमान आणि स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणादायी प्रवासाचे भव्य चित्रण यात करण्यात आले आहे. अभिनेता रितेश विलासराव देशमुख यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून मुख्य भूमिका देखील साकारली आहे. त्यांच्या दिग्दर्शनातून ऐतिहासिक विषयाला आधुनिक सिनेमॅटिक भव्यतेची जोड देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो.

या चित्रपटाची एक मोठी जमेची बाजू म्हणजे त्याची दमदार स्टारकास्ट. संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, बमन ईरानी, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद जोशी,अमोल गुप्ते, जिनिलीया देशमुख , आणि रितेश विलासराव देशमुख यांसारख्या दिग्गज कलाकारांची फळी या चित्रपटात एकत्र आली आहे.

यात थरारक अॅक्शन दृश्ये, वेधक आणि भावनिक नाट्य, दमदार संवाद आणि अंगावर रोमांच उभे करणारे संगीत यामुळे हा चित्रपट केवळ एक ऐतिहासिक कथा न राहता एक भव्य सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे. सुप्रसिद्ध संगीतकार जोडी अजय-अतुल यांनी दिलेले दर्जेदार संगीत, तर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार संतोष सिवन यांची सिनेमॅटोग्राफी असल्यामुळे 'राजा शिवाजी' हा चित्रपट मराठीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा चित्रपट तर आहेच याशिवाय भारताच्या ऐतिहासिक वारस्याला जागतिक स्तरावर सादर करण्याची क्षमता ठेवतो.

चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या या टीझरला मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद हा या चित्रपटाबद्दलच्या प्रेक्षकांच्या अपेक्षांचा ठोस पुरावा आहे. खचाखच भरलेल्या थिएटर्समध्ये उमटलेल्या टाळ्या, शिट्ट्या आणि जल्लोष यावरून 'राजा शिवाजी'च्या ऐतिहासिक विश्वात रममाण होण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत, हे स्पष्ट होते. आता डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाल्यानंतर हा टीझर आणखी मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचत असून, या भव्य चित्रपटाच्या यशस्वी प्रवासाची दमदार सुरुवात ठरत आहे.

'राजा शिवाजी' हा चित्रपट एका प्रेरणादायी कथा असून हा चित्रपट भाषेच्या सीमा ओलांडत जागतिक स्तरावर सादर करण्याचे निर्मात्यांचे उद्दिष्ट आहे.

जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी या बॅनरखाली ज्योती देशपांडे व जिनिलीया देशमुख यांनी निर्मिती केली आहे. 'राजा शिवाजी' हा चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी, हिंदी आणि तेलुगू भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या उदयाला समर्पित असलेला हा चित्रपट प्रेक्षकांसाठी एक भव्य, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559